| MHPU240009982018 | <u>रे. मु. नं. १२६/२०१८</u><br>**विशाल थोरात व इतर**<br>विरुद्ध<br>**विलास थोरात व इतर** |
|---|---|

## <u>निशाणी क्र. ३१ व ३३ खालील आदेश</u>

**०१.** प्रतिवादी क्र.२ यांनी प्रस्तुतचे अर्ज वादीच्या दाव्यावर त्यांचेविरुद्ध झालेला 'कैफियत नाही' चा आदेश रद्द होउन मिळण्यासाठी व कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ होवून कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहेत. सदर अर्जावर वादीचे लेखी म्हणणे मागविण्यात आले.

**०२.** अर्जातील प्रतिवादींचे कथनानुसार, सदर दाव्याचे समन्स प्रतिवादी यांना दि. १७.१२.२०१८ रोजी मिळाले. परंतु, प्रतिवादी क्र. २ पायाने अपंग, वयोमानाने आजारी व अर्धांगवायुमुळे आजारी असल्याने त्यास मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यासाठी सुमारे साडे सहा वर्षांचा विलंब झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादींविरूद्ध कैफियत नाही चा आदेश पारित झालेला आहे. त्यामुळे, वरील सर्व कारणांचा विचार करता प्रतिवादी यांचेविरुद्ध झालेला 'कैफियत नाही' चा आदेश रद्द होउन झालेला विलंब माफ होउन प्रतिवादी यांना त्यांची कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणे आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रस्तुतच्या अर्जावर वादींनी म्हणणे दाखल केले. वादींच्या म्हणण्यानुसार, अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तिक नाही. विलंबाचे खोटे कारण नमुद केले आहे. प्रतिवादीने जाणिवपुर्वक साडे सहा वर्षांचा विलंब केला आहे. आजारपणाबाबतचे कोणतेही कागदपत्रे दाखल केलेले नाहीत. सबब, प्रतिवादी यांचे अर्ज नामंजुर करण्यात यावेत, अशी विनंती केली आहे.

**०४.** अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. संपुर्ण

दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव व निरंतर मनाई ताकिद मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. २ हे दि. ०२/०१/२०१९ रोजी दाव्याकामी हजर झाल्याचे दिसुन येते. प्रतिवादी क्र. २ यांनी प्रस्तुतचे अर्ज दि.२४/०९/२०२४ रोजी दाखल केलेले दिसुन येतात. प्रतिवादी क्र. २ यांना कैफियत दाखल करण्यास सुमारे सात वर्षापेक्षा जास्त विलंब झालेला दिसतो. अर्जात नमुद केलेली कारणे कागदोपत्री पुराव्याअभावी संयुक्तिक वाटत नाहीत. सदर अर्जातील कथनाचे सत्यतेसाठी प्रतिवादी क्र. २ यांनी नि. क्र. ३२ व ३४ नुसार त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांची कैफियत दाव्याकामी सामील करून न घेतल्यास दाव्यातील गुंतागुंत निश्चितच वाढणार आहे व सर्व बाजूंचा न्यायिक विचार करुन अर्ज निर्गत करणे अडचणीचे होणार आहे. याउलट, प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास दाव्यातील वादाचे निश्चित स्वरूप न्यायालयासमोर येवून दावा निर्गत करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणेस नैसर्गिक न्यायतत्वानुसार गरजेचे असल्याने प्रतिवादींचा प्रस्तुतचे अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. शिवाय, वादी यांनी प्रतिवादींचे प्रस्तुत अर्जास स्पष्ट हरकत घेतल्याचे दिसून येत नाही. सबब, प्रतिवादी क्र.२ यांना कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत योग्य तो खर्च आकारून अर्ज निर्गत करणे आवश्यक असल्याचे निर्णयाप्रत येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो :

**—: <u>आदेश</u> :—**

१. प्रतिवादी क्र. २ यांचे प्रस्तुत अर्ज निशाणी क्र.३१ व ३३ हे मंजूर करण्यात येतात.

२. प्रतिवादी क्र. २ यांचेविरुद्ध झालेला ‘कैफियत नाही’ चा आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.२ यांना दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब त्यांनी रक्कम रू.५०००/— (एकूण रुपये पाच हजार) खर्च वादींना देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

४. प्रतिवादी क्र.२ यांनी दिलेली कैफियत, आदेशित दंडाची रक्कम जमा केल्यानंतर दाव्याच्या कामी दाखल करण्यात यावी.

MEGHA SHASHIKANT MALI
Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI
Date: 2024.12.13 11:39:36 +0530

**(श्रीमती एम. एस. माळी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगांव, जि. पुणे.

स्थळ – घोडेगांव
दि. ०९/१२/२०२४